नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १६ Issue - 16 | वार - बुधवार दि. १० जून २०२६ Blow- Wednesday Date 10 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## मागील कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफी मिळणार

### मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य सरकारचे ४ धडाकेबाज निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (९ जून) राज्य सरकारची मंत्रिमंडळ बैठक घेण्यात आली. या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.



शेतकऱ्यांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफी मिळणार आहे. यासाठी जवळपास १४ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक शेतकरी अडकले होते. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनेत अनेक शेतकऱ्यांना पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा यासाठी वारंवार मागणी होत होती. त्यामुळे आज २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक वंचित राहणाऱ्या ५ लाखपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत सरकारने घेतला महत्वाचा निर्णय

मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेस मान्यता. तेरा विभागांची पूनर्रचना. यामुळे एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे स्वतंत्र विभाग होणार. आता ३३ प्रशासकीय विभाग होते, त्यांची संख्या १० ने वाढून ४३ होणार. पण नवीन पद निर्मिती होणार नाही, पण विभागांना आता सुलभपणे काम करता येईल, अशा पद्धतीने कामकाजांची विभागणी होणार. निर्णय प्रक्रिया गतीमान होणार. (सामान्य प्रशासन विभाग)

राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी यांना मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. (उच्च व तंत्र शिक्षण विभाग)

केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतूदींना सुसंगत आणि सूसत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा तसेच त्याअन्वये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. (वित्त विभाग)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडसाठी कर्ज उभारणीकरता अधिकारात वाढ करणार. अध्यादेश काढण्यास तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंजुरी. (उद्योग विभाग)

योजना अंमलबजावणीसाठी व बँकासोबत वाटाघाटीसाठी सचिवस्तरीय समिती- योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती काम करेल. तसेच राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका व ग्रामीण बँकांकडील शेतकर्यांच्या पीक कर्ज/पुनर्गठित अनुत्पादित कर्जांना कर्जमुक्तीचा लाभ देत असताना अनुत्पादित कर्जाच्या तारखेनुसार कर्ज खतावणी शिल्लकेला निश्चित केलेल्या टक्केवारीप्रमाणे सूट देण्याची रक्कम निश्चित केली जाईल. यासाठी बँकासोबत वाटाघाटी करुन सूट देण्याची रक्कमेचे प्रमाण निश्चित करण्यासाठी अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली, प्रधान सचिव (सहकार), व्यवस्थापकीय संचालक (महा-आयटी), प्रशासक महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, समन्वयक, राज्यस्तरीय बँकर्स समिती व सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांची समिती काम करेल. ही योजना राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून घेतलेल्या कर्जास तसेच प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांनी त्यांच्या स्वत:च्या निधीतून वितरित केलेल्या कर्जांना देखील लागू राहील. यासाठी शेतकर्यांचे आधार प्रमाणीकरण केले जाईल. तसेच, ॲग्रीस्टॅक आधार सामग्री मंचावर शेतकर्यांची नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. योजनेच्या कार्यान्वयनासाठी अद्ययावत पोर्टल विकसित करण्यात येईल.

## उज्ज्वला योजनेतील अनुदानित सिलेंडरची संख्या ९ वरुन ४ पर्यंत घटवली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : रालोआ सरकारची लोकप्रियता अनेकपटींनी वाढवणाऱ्या आणि राजकीयदृष्ट्या गेमचेंजर ठरलेल्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेबाबत केंद्र सरकारने एक कठोर निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, उज्ज्वला योजनेतील सवलतीच्या सिलेंडरला आता कात्री लावण्यात आली आहे. परिणामी उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना दरवर्षी ९ ऐवजी आता फक्त ४ सिलेंडरसाठीच ३०० रुपये अनुदान मिळेल. सध्याच्या घडीला देशभरात उज्ज्वला योजनेचे १० कोटी ५५ लाखांपेक्षा अधिक लाभार्थी आहेत. २०१६ साली पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजना सुरु करण्यात आली होती. सध्याच्या घडीला आंतरराष्ट्रीय बाजारात एलपीजी गॅसची किंमत वाढली आहे. त्यामुळे तेल कंपन्यांना सध्या प्रति सिलेंडर ७०० रुपये तोटा होत आहे. त्यामुळे आता केंद्र सरकारने अनुदानिक गॅस सिलेंडरची संख्या घटवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. काही दिवसांपूर्वीच घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरात २९ रुपयांनी वाढ करण्यात आली होती. त्यामुळे १४.२ किलोच्या एलपीजी सिलेंडरची किंमत ९४२ रुपयांच्या घरात पोहोचली आहे. त्यामुळे आता उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांना ४ अनुदानित गॅस सिलेंडर संपल्यानंतर ९४२ रुपये मोजून एलपीजी गॅस विकत घ्यावा लागणार आहे.युद्धामुळे आतापर्यंत एलपीजी ४६ टक्क्यांनी महाग झाला आहे. उज्ज्वला योजनेच्या माध्यमातून लाभार्थ्यांना ६४२ रुपयांना अनुदानित गॅस सिलेंडर मिळत होता. त्यासाठी प्रत्येक अनुदानित सिलेंडरमागे केंद्र सरकार ३०० रुपये अनुदान देत होते. आता उज्ज्वला योजनेअंतर्गत ६४२ मध्ये आता वर्षाला ४ सिलेंडरच मिळतील. चारपेक्षा जास्त गॅस सिलेंडर लागल्यास त्यासाठी अधिकची रक्कम मोजावी लागणार आहे. याचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील कुटुंबाना बसण्याची शक्यता आहे. उज्ज्वला योजना सुरु करण्यात आली तेव्हा हा केंद्र सरकारचा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून गणला गेला होता. या योजनेची प्रचंड जाहिरात आणि गाजावाजा झाला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह प्रमुख नेत्यांनी ग्रामीण भागात चुलीवर स्वयंपाक करणाऱ्या महिलांना एलपीजी गॅस वापरण्याचे आवाहन केले होते. त्यामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांनी पारंपरिक पद्धतीने चुलीवर स्वयंपाक करण्याचे सोडून एलपीजी गॅसचा वापर सुरु केला होता. मात्र, आता अनुदानित गॅस सिलेंडरची संख्या ९ वरुन अवघी ४ इतकी करण्यात आल्याने वर्षभर स्वयंपाकापासून इतर गोष्टी कशा करायच्या, असा प्रश्न या कुटुंबाना पडण्याची शक्यता आहे.

**घरगुती एलपीजी गॅसबाबत केंद्र सरकारचा महत्त्वाचा निर्णय**

## होर्मुजची कोंडी फुटणार! 'ओमान ते गुजरात' पाईपलाईन प्रकल्प भारत मार्गी लावणार!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : सध्या पश्चिम आशिया युद्धाच्या आणि तणावाच्या छायेत आहे. या वाढत्या अस्थिरतेमुळे जगभरात इंधनाच्या संकटाची भीती निर्माण झाली आहे. भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेला याचा सर्वात मोठा फटका बसू शकतो, कारण आपली अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर आखाती देशांतून येणाऱ्या इंधनावर अवलंबून आहे. ही संभाव्य कोंडी फोडण्यासाठी आणि देशाची ऊर्जा सुरक्षा अबाधित राखण्यासाठी भारताने एक अत्यंत धाडसी आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. भारत आता ओमानपासून थेट गुजरातपर्यंत अरबी समुद्राच्या खालून तब्बल २००० किलोमीटर लांबीची 'डीप-सी गॅस पाईपलाईन' टाकण्याच्या तयारीत आहे. हा निर्णय भारताच्या सामरिक आणि आर्थिक वाटचालीतील एक मोठा 'गेमचेंजर' मानला जात आहे.

ओमान आणि गुजरातला थेट पाईपलाईनने जोडण्याची ही महत्त्वाकांक्षी संकल्पना आजची नाही, तर गेल्या ३० वर्षांपासून यावर चर्चा सुरू होती. मात्र, समुद्राची अथांग खोली, तिथे येणारी तांत्रिक आणि इंजिनिअरिंगची महाकाय आव्हाने आणि प्रकल्पाचा प्रचंड खर्च यामुळे हे स्वप्न केवळ कागदावरच अडकून पडले होते. पण आता 'साऊथ एशिया गॅस एंटरप्रायजेस' या खासगी कंपनीने या प्रकल्पाला नवसंजीवनी दिली आहे.

कंपनीने अलिकडेच समुद्राच्या तळाचे तांत्रिक सर्वेक्षण आणि आर्थिक अभ्यासाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केले असून, या महाप्रकल्पाला आता खऱ्या अर्थाने हिरवा कंदील मिळाला आहे.

## दहशतवाद्यांचे मदतनीस शोधण्यासाठी एनआयएचे १८ ठिकाणी छापे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : दहशतवाद्यांचे मदतनीस शोधण्यासाठी एनआयएने पंजाब आणि हरियाणात एकूण अठरा ठिकाणी छापे टाकले. पाकिस्तानी दहशतवादी शहजाद भट्टीशी लागेबांधे असलेल्यांना शोधण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. डिजिटल उपकरणांच्या सहकार्याने एकमेकांच्या संपर्कात राहणे, संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि संवेदनशील माहितीची देवाणघेवाण या प्रकरणी एनआयएने ही कारवाई केली. छापे टाकून एनआयएने अनेक डिजिटल उपकरणे तसेच कागदपत्रे जप्त केली. या जप्तीमधून भारतविरोधी षडयंत्राचा सुगावा लागल्याचे समजते. या प्रकरणात पुढील चौकशीसाठी काही जणांना एनआयए कार्यालयात हजर होण्यासाठी नोटीस बजावण्यात आली आहे. लवकरच या प्रकरणात धरपकड होण्याची शक्यता आहे.

एनआयएच्या आतापर्यंतच्या तपासात, पंजाबच्या जालंधर येथील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर रॉजर संधूच्या निवासस्थानावर मार्च २०२५ मध्ये झालेल्या ग्रेनेड हल्ल्यामागे शहजाद भट्टीचा हात असल्याचे निष्पन्न झाले आहे. या वर्षी एप्रिलमध्ये, एनआयएने भट्टी आणि या प्रकरणातील आणखी एका आरोपीविरुद्ध फरार म्हणून आरोपपत्र दाखल केले होते. सिरसा प्रकरणात, एनआयएने मे २०२६ मध्ये भट्टी आणि पाकिस्तानस्थित दुसरा हँडलर, सोहेल अहमद उर्फ सोहेल बलोच याच्यासह नऊ जणांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते.बलदेव नगर पोलीस ठाण्यातील प्रकरण एका कार बॉम्बस्फोटाशी संबंधित आहे, ज्यामध्ये अटक केलेल्या आरोपींपैकी एक जण भट्टीच्या संपर्कात असल्याचे आढळून आले आहे.एनआयएचा तीन प्रकरणांमधील तपास सुरू आहे.



## संपादकीय....

### कर्जमाफीचा लाभ

शेतकऱ्यांसाठी मंत्रिमंडळ बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. मागील कर्जमाफी योजनेत राहिलेल्या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफी मिळणार आहे. यासाठी जवळपास १४ हजार कोटी रुपये दिले जाणार आहेत. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक शेतकरी अडकले होते. २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफी योजनेत अनेक शेतकऱ्यांना पात्र असूनही कर्जमाफीचा लाभ मिळाला नव्हता. या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा यासाठी वारंवार मागणी होत होती. त्यामुळे आज २०१७ आणि २०१९ च्या कर्जमाफीत अनेक वंचित राहणाऱ्या ५ लाखपेक्षा अधिक शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मंत्रालयीन विभागांच्या पुनर्रचनेस मान्यता. तेरा विभागांची पूनर्रचना. यामुळे एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे स्वतंत्र विभाग होणार. आता ३३ प्रशासकीय विभाग होते, त्यांची संख्या १० ने वाढून ४३ होणार. पण नवीन पद निर्मिती होणार नाही, पण विभागांना आता सुलभपणे काम करता येईल, अशा पद्धतीने कामकाजांची विभागणी होणार. निर्णय प्रक्रिया गतीमान होणार. (सामान्य प्रशासन विभाग) राज्यातील नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता, विस्तारीकरणात नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम व नवीन विषय, तुकडी यांना मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता. केंद्रीय वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मधील तरतूदींना सुसंगत आणि सूसत्रतेसाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा तसेच त्याअन्वये महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२६ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

# राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; सक्षम पणन सुधारणांचा नवा अध्याय

## शेतकऱ्यांच्या व्यापक हितासाठी मुंबई आणि नागपूर राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अस्तित्वात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार (चरीझर्शी ेष छर्रीेळेपरश्र खार्ौींरिपलश) कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६३ मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' ही संकल्पना आहे.

या सुधारणांची बीजे २०२४-०५ पासून पेरली गेली. त्यानंतर २०१७-१८ मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे.

पणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

त्याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष, तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल.

राष्ट्रीय महत्वाचा बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान ८० हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल.

मोठ्या बाजारांमध्ये पणन मंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील.

बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी-केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत.

या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल ॲग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे १२०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे.

या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या १२ ते १४ तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहोचवणे शक्य होणार असून, त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील.

राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

**-बी.सी.झंवर,**
**विभागीय संपर्क अधिकारी.**

## वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिंदगाव ता.तुळजापूर येथील बुद्ध-फुले-शाहू-आंबेडकर,चळवळीतील एक अभ्यासू आणि निष्ठावंत कार्यकर्ते,आपल्या मधुर वाणीतून बुद्ध फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करणारे भिमशाहीर हार्मोनियम वादक तथा गायक मा.चंद्रकांत शिंदे साहेब (प्रमाणित लेखा-परीक्षक जिल्हा धाराशिव) यांचा दि.१० जून रोजी वाढदिवस आहे.

मा.चंद्रकांत शिंदे हे प्रतिकूल परिस्थितीवर मात करत बी.कॉम. एम.कॉम ,जी.डी.सी अँड ए.पदवी संपादन करून दुय्यम निबंधक धाराशिव जिल्हा अंतर्गत सहकार संस्थेच्या ऑडिट पॅनलवर राहुन संस्थांच्या हिशोब तपासणीचे काम काटेकोरपणे व प्रामाणिकपणे करतात.आपलं काम घर संसार सांभाळत ते भीमगीत गायनाच्या माध्यमातून समाज समाज प्रबोधनाचे सामाजिक कार्य शालेय जीवनापासून ते आज तागायत करित आहेत. त्याच बरोबर शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी असलेल्या अडीअडचणी बाबत मार्गदर्शन करून त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रवर्त करण्यात त्यांचा मोठा हातखंड आहे. आपल्या सर्व नातेवाईकांमध्ये ते चंद्रकांत अण्णा म्हणून परिचित आहेत. त्यांचा सर्वांशी मिळून मिसळून राहण्याचा स्वभाव मानवतेची शिकवण देणार आहे असे म्हणले तर वावगे ठरणार नाही. आपल्या सर्व मित्रमंडळीत व आप्तेष्ट नातेवाईकात एक आदराने स्थान त्यांनी निर्माण केला आहे.

दिनांक १० जून हा त्यांचा ६१ वा वाढदिवस त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना खूप खूप शुभेच्छा...

**- एस. के. गायकवाड**
**(रिपाइं (आठवले) जिल्हा**
**जिल्हा सचिव तथा पत्रकार**
**मु.पो. वागदरी ता.तुळजापूर**

# अन्नदात्यासाठी अन्नत्याग : शेतकऱ्यांच्या न्यायासाठी पंढरपुरात आंदोलन


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्रातील लाखो शेतकरी आज कर्ज, नापिकी, बाजारभावातील घसरण, पिकविमा कंपन्यांचा अन्याय आणि सरकारच्या उदासीन धोरणांमुळे प्रचंड आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत. राज्यातील अन्नदाता अक्षरशः जगण्यासाठी संघर्ष करत असताना सरकार मात्र जाहिराती आणि घोषणांमध्ये व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात करण्यात आलेल्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना आज विविध अटी-शर्तींच्या जंजाळात अडकवून नव्या कर्जमाफीपासून वंचित ठेवले जात आहे. अनेक शेतकरी नियमित कर्जफेड करूनही प्रोत्साहन अनुदानापासून वंचित आहेत. पिकविमा योजनेत शेतकऱ्यांकडून प्रीमियम घेतला जातो, मात्र नुकसान झाल्यानंतर मदतीच्या नावाने केवळ निराशा पदरी पडते.

या सर्व पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आणि सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि. १२ जून २०२६ रोजी पंढरपूर येथे अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन करण्यात येणार आहे.

विठ्ठलाच्या नगरीत होणारे हे आंदोलन कोणत्याही पक्षाचे नसून महाराष्ट्रातील प्रत्येक शेतकऱ्याच्या हक्कासाठीचा आवाज आहे. ज्यांच्या कष्टावर देशाचे पोट भरते, त्या अन्नदात्याला न्याय मिळावा यासाठी आम्ही एक वेळ अन्नत्याग करून



शासनाच्या संवेदनांना साद घालणार आहोत.

आंदोलनातील प्रमुख मागण्या :

२०१९ च्या कर्जमाफीचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांवरील मर्यादा रद्द करून सर्व पात्र शेतकऱ्यांना सरसकट २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्यात यावी.

एकवेळ समझोता (जढड) योजनेतील अन्यायकारक अटी रद्द करून सर्व शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा.

२ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठीही सवलतीच्या अटींसह कर्जमाफी लागू करावी.

प्रोत्साहनपर अनुदानासाठी नियमित कर्जफेडीची दोन वर्षांची अट रद्द करावी.

२०१७ च्या कर्जमाफीस पात्र असूनही केवळ कागदपत्रांच्या त्रुटींमुळे वंचित राहिलेल्या लाखो शेतकऱ्यांना तातडीने लाभ द्यावा.

शेतकरी विरोधी अटी रद्द करून १ रुपयात पीकविमा योजना पुन्हा प्रभावीपणे लागू करावी.

पेरणीपूर्वी शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून त्यांच्या खात्यात आवश्यक रक्कम उपलब्ध करून द्यावी.

आज शेतकरी भीक मागत नाही, तर त्याच्या हक्काची मागणी करत आहे. सरकारने उद्योगपतींसाठी हजारो कोटी रुपयांचे निर्णय तातडीने घेतले, तर मग महाराष्ट्राच्या अन्नदात्यांसाठी संवेदनशील भूमिका का घेतली जात नाही, हा प्रश्न आम्ही उपस्थित करत आहोत.

महाराष्ट्रातील सर्व शेतकरी, शेतकरी संघटना, युवक, महिला आणि नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होऊन अन्नदात्याच्या न्यायाच्या लढ्याला बळ द्यावे, असे आवाहन मी करतो.

**– रोहित पवार**
**आमदार, कर्जत-जामखेड**
**विधानसभा मतदारसंघ**

# एसटीच्या हलगर्जीपणाचा फटका; 'तीर्थस्थान' योजनेतील महिला भाविक ३ तास ताटकळल्या!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या एसटी संगे तीर्थस्थान योजनेचा गाजावाजा केला जात असला, तरी कळंब आगारातील नियोजनशून्यता आणि कर्मचाऱ्यांच्या कथित हलगर्जीपणामुळे रविवारी (७ जून) महिला भाविकांना तब्बल तीन तास बसस्थानकाच्या प्रवेशद्वारावर ताटकळत उभे राहावे लागल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




कळंब आगारातून नाशिक, शिखर शिंगणापूर, पुरुषोत्तमपुरी, शिर्डी, पंढरपूर आणि अष्टविनायक दर्शनासाठी विशेष बसेस सोडण्यात आल्या होत्या. मात्र, वेळेवर योग्य बसेस उपलब्ध न झाल्याने संपूर्ण व्यवस्थेचा बोजवारा उडाला. परिणामी अनेक बस दोन ते तीन तास उशिराने रवाना झाल्याची माहिती समोर येत आहे.

स्थानिक स्तरावर अशीही चर्चा रंगली आहे की, आगारात काही चालकांची मर्जी सांभाळून त्यांना चांगल्या व नव्या बसेस दिल्या जातात, तर इतर चालकांच्या वाट्याला जुन्या आणि बिघाडग्रस्त बसेस येतात. त्यामुळे चालक-वाहकांना तारेवरची कसरत करावी लागत असून प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

याचबरोबर कळंब आगारात कायमस्वरूपी वाहन परीक्षक नसल्याने कोणाच्या तरी मर्जीतील वाहन परीक्षकाची नियुक्ती करून चालकांची पिळवणूक केली जात असल्याची दबक्या आवाजात चर्चा चालक वर्गात सुरू आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने कायमस्वरूपी वाहन परीक्षकाची नियुक्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

विशेष म्हणजे शिखर शिंगणापूर दर्शनासाठी पहाटे पाच वाजल्यापासून महिला भाविक बसस्थानकात जमल्या होत्या. मात्र, त्यांच्यासाठी देण्यात आलेल्या जुन्या बसमध्ये बसण्यास महिलांनी नकार दिला. नव्या बसची मागणी करत महिला बसस्थानकाच्या गेटवरच ठिय्या देऊन उभ्या राहिल्या. अखेर प्रशासनाला नमते घ्यावे लागले आणि महिलांसाठी नवीन बसची व्यवस्था करण्यात आली. मात्र तोपर्यंत तीन तासांचा विलंब झाला होता.

भाविकांच्या मते, धार्मिक यात्रेसाठी आलेल्या महिलांना अशा प्रकारे ताटकळत ठेवणे ही एसटी प्रशासनासाठी लाजिरवाणी बाब आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू केलेल्या योजनेतच नियोजनाचा अभाव दिसून येत असल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

आता या संपूर्ण प्रकाराची आगारप्रमुख दखल घेणार का? जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? आणि भाविकांची झालेली गैरसोय भरून काढण्यासाठी कोणती उपाययोजना केली जाणार? याकडे कळंब तालुक्याचे लक्ष लागले आहे.

भाविकांना दर्शनाची ओढ, पण एसटी प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे तासन्तास प्रतीक्षा अशी संतप्त भावना महिला भाविकांमधून व्यक्त होत आहे.

# कौठाळी येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सोहळ्यानिमित्त कौठाळी येथील ग्राम सचिवालया समोर स्वराज्य गुडीउभारून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी शिवस्वराज्य गुढीला मानवंदना दिली.

यावेळी सरपंच महादेव गाढवे, अनिल नागटिळक, दिलीप इंगळे,अरुण नागटिळक, रामदास नागटिळक, सचिन आटकळे, शिवाजी नागटिळक,पै.सोमनाथ नागटिळक, पै. मधुकर नागटिळक,विकास नागटिळक, हरी सलमपुरे, समाधान चव्हाण, नरहरी नागटिळ,सज्जन नागटिळक,बाळू नागटिळक, मारुती नागटिळक, बाळू मुळे यांच्यासह बहुसंख्य शिवप्रेमी बांधव उपस्थित होते

यावेळी शिवन्या शंकर वाघमारे हिने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची आणि गुणांची ओळख करून करून देणारी हस्ते कदम ही शिवगर्जना म्हणून छत्रपती शिवरायांचा जयघोष केला.शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त कौठाळी येथील कार्यतत्पर, कर्तव्यदक्ष, शिवप्रेमी मावळ्यांनी शिवछत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी दुर्गराज किल्ले रायगडाकडे रवाना झाले होते. रायगडावर या मावळ्यांनी शिवरायांचा जयघोष करत मानवंदना दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर येथून माझी बदली झाली, परंतु सोलापूर हे माझ्या मनात कायमस्वरूपी राहील : नागपूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

- सर्वांच्या सहकार्यातून सोलापूर जिल्ह्यात विविध विकासात्मक कामे करणे शक्य झाले
- अधिकारी कर्मचाऱ्यांना संवेदनशीलता ठेवून रजाही दिल्या पाहिजेत
- जिल्हाधिकारी कठोर राहिले तरच प्रशासन अधिक गतिमान पद्धतीने काम करते
- महसूल व अन्य विभागाच्या अधिकाऱ्यामार्फत बदलीनिमित्त जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा सत्कार तर जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूर येथे २२ जुलै २०२३ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी म्हणून काम केले. जवळपास या तीन वर्षाच्या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे हाताळण्यात आली. येथील नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्यातून हाती घेतलेली जवळपास सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी जे प्रेम व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे खूप आभारी आहे. तसेच ३ एप्रिल २०२६ रोजी माझी बदली नागपूर येथे झाली असली तरी सोलापूर जिल्हा कायमस्वरूपी माझ्या मनात आहे व राहील, असे भावनिक उद्गार तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या निरोप समारंभाच्या प्रसंगी काढले.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर येथे बदली झाल्या निमित्त निरोप समारंभ कार्यक्रम नियोजन भवन येथील सभागृहात त आयोजित करण्यात आलेला होता, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी सर्वश्री संतोषकुमार देशमुख, सुशांत बनसोडे, सुमित शिंदे, सदाशिव पडदुने, विजया पांगारकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अन्य धान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकार कर्मचारी तसेच प्रशासनातील अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्हाधिकारी पदाची यशस्वी कारकीर्द ही येथील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कामावर अवलंबून असते. नव्याने रुजू झाल्यानंतर पहिल्या दोन-तीन महिन्यातच कोणत्या अधिकाऱ्याकडून कोणत्या प्रकारची कामे करून घेता येतील याची माहिती होणे गरजेचे असते. तसेच वेळप्रसंगी अधिकारी कर्मचाऱ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना रजाही देणे आवश्यक असते. परंतु जिल्हाधिकारी यांनी कठोर असणे आवश्यक आहे. कारण जिल्हाधिकारी कठोर राहिले तर प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी अधिक गतीने कामे करतात व त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेला लवकर मिळण्यात होऊन शासन व प्रशासनाची चांगली प्रतिमा तयार होण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

महसूल प्रशासनाबरोबरच इतर विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी केलेल्या उत्कृष्ट सहकार्यामुळेच आपण सोलापूर जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे मार्गी लावण्यात यशस्वी झालो असे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगून पंढरपूर कॉरिडॉर, सोलापूर येथील विमान सेवा सुरू करणे, आषाढी वारीचे यशस्वी आयोजन, पूर परिस्थितीत सर्व प्रशासकीय यंत्रणेने केलेले कामकाज तसेच प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न, यामुळे येथे आपण काहीतरी सर्वसामान्यांसाठी काम करू शकलो याचे समाधान वाटते, असे त्यांनी सांगितले. तसेच नागपूर येथे बदली झाली असली तरी सोलापूर जिल्ह्याच्या कोणत्याही प्रकारच्या कामासाठी आपण सांगितले तर ते काम करण्यासाठी तत्पर असल्याचेही त्यांनी यावेळी सूचित केले.

जिल्हाधिकारी एस कार्तिकेयान यावेळी म्हणाले की, मागील दोन महिन्यापासून जिल्हाधिकारी म्हणून आपण सोलापूर मध्ये काम करत असून तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येथे जी प्रशासकीय कामकाजाची चौकट निर्माण केली आहे, त्यामुळे कामे करताना कोणतीही अडचण येत नाही. येथील सर्व अधिकारी कर्मचारी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पडतात. तसेच श्री आशीर्वाद सरांनी जे आपले अनुभव मला सांगितलेले आहेत त्या पद्धतीने कामकाज करून सोलापूर जिल्हा विविध विकासकामात अग्रेसर ठेवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी की कुशल जैन यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कामाचे व कार्यपद्धतीचे कौतुक केले.

सोलापूर जिल्ह्यातील प्रशासकीय कारभारात तीन वर्षे कुशल नेतृत्व व मार्गदर्शन देणारे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा निरोप समारंभ सोमवारी सायंकाळी पार पडला. या प्रसंगी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी संघटनांचे प्रतिनिधी यांनी मनोगत व्यक्त करून त्यांच्या कार्यकाळाचा आढावा घेतला. यामध्ये तहसीलदार मदन जाधव यांनी प्रशासकीय अनुभव शेअर करत जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे कामकाज सुलभ झाल्याचे सांगितले. निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी प्रास्ताविक करून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले.उत्पादन शुल्क अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी मनोगत व्यक्त करत त्यांच्या निर्णयक्षमतेची प्रशंसा केली.जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या तीन वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. महत्वाच्या निर्णयांची माहिती देत त्यांनी कुशल नेतृत्व अधोरेखित केले.उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर व उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनीही मनोगत व्यक्त करून जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. महसूल संघटनेचे पदाधिकारी शंतनू गायकवाड रविराज नसते यांनीही आपले मनोगत यावेळी व्यक्त केले. तसेच सर्व संघटनाचे पदाधिकारी व सर्व अधिकारी कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांना दिलेले प्रोत्साहन. समारंभात उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तर तहसील चे तहसीलदार निलेश पाटील यांनी केले तर आभार अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील महसूल विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीचे औचित्य राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार सोहळा संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे अवचित साधून समृद्धी बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आज सोलापूर येथे राज्यस्य समाज रत्न पुरस्कार श्री नितीन काळे यांना देण्यात आला त्यांनी बोलताना सांगितले की हा पुरस्कार माझा तर आहेच पण तुम्हा सर्वांचा आहे तुम्ही सर्वांनी मला लढण्याची ताकद दिली त्या ताकदीवर मी आज तुमच्यासमोर एवढ्या मोठ्या ताकतीने उभा आहे.

तुमच्या या सर्व मला सहकार्यामुळे मी आजही पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे अवचित साधून हा समाज रत्न राज्यस्तरीय पुरस्कार मला मिळाला आहे असे त्यांनी बोलताना सांगितले.

## स्वेरी फार्मसीच्या प्रा.सतीश मांडवे यांना पीएच.डी. प्रदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँन्ड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.) चे प्रा. सतिश वसंत मांडवे यांना नुकतीच पंजाब मधील लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी या विद्यापीठाकडून फार्मसीमध्ये पीएच.डी. प्रदान करण्यात आली. 'डेव्हलपमेंट अँड इव्हॅल्युएशन ऑफ मॉडिफाइड रिलीज टॅब्लेट्स ऑफ लोव्हास्टॅटिन अँड ओलिनोलिक ॲसिड' या विषयावर त्यांनी आपला शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला होता. ही पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

डॉ. नरेंद्र कुमार पांडे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांच्या सहकार्याने प्रा. सतीश मांडवे यांनी फार्मसीमधील पीएच.डी. पूर्ण केली आहे. डॉ. मांडवे यांनी पीएच.डी. च्या संशोधनात वेगवेगळ्या पद्धतीच्या मॉडिफाइड रिलीज टॅब्लेट्सची निर्मिती करून त्यांची क्षमता तपासली होती. आत्तापर्यंत डॉ. मांडवे यांचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये एकूण आठ संशोधनपर पेपर्स प्रसिद्ध झाले आहेत. पीएच.डी. प्राप्त केल्याबद्धल स्वेरीच्या वतीने डॉ. मांडवे यांचा सत्कार एरंडोळ (ता.आजरा. जि.कोल्हापूर) येथील एरंडोळ हायस्कूलचे मुख्याध्यापक मलाप्पा तळवलकर यांच्या हस्ते करण्यात आला. डॉ. मांडवे हे स्वेरीच्या डी.फार्मसी महाविद्यालयात गेल्या पंधरा वर्षापासून उत्कृष्टपणे ज्ञानदान करत असून नऊ वर्षांपासून प्राचार्य पदी कार्यरत आहेत. स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ.सुरज रोंगे, यांच्यासह इतर विश्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. बनकर, इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी डॉ.मांडवे यांचे अभिनंदन केले आहे.

**स्वेरीचे संस्थापक डॉ. बी.पी. रोंगे सर हे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना उच्चशिक्षण घेण्यासाठी व आपली शैक्षणिक पात्रता अद्ययावत करण्यासाठी नेहमी प्रेरणा व प्रोत्साहन देत असतात. स्वेरीतील सुमारे ४५ प्राध्यापकांनी आय.आय.टी., एन.आय.टी., आय. आय. एससी. अशा विविध प्रख्यात संस्थामधून पीएच.डी. पूर्ण केली असून सुमारे ६० प्राध्यापक पीएच.डी. पूर्ण करण्याच्या प्रक्रियेमध्ये आहेत.**

## कौठाळी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. जयंती उत्सव समितीच्या वतीने संयोजक, सरपंच महादेव गाढवे यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी व बारावी पास गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पोलीस पाटील श्रीकांत नागटिळक यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी काय करावे यावर बहुमोल अशी मार्गदर्शन केले

यावेळी मार्केट कमिटीचे संचालक अरुण नागटिळक, मा.सरपंच दत्तात्रय धुमाळ मा. सरपंच अरुण नागटिळक,इंजिनीयर सचिन धुमाळ, तानाजी धुमाळ, उद्योजक विठ्ठल धुमाळ, रिल स्टार समाधान चव्हाण,राजू इनामदार, बंडू धुमाळ,सचिन नागटिळक, गणेश धुमाळ, राहुल लवटे यांच्या सह बहुसंख्या शिक्षण प्रेमी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लवटे, गाढवे, वाघमोडे परिवारातील कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम दास नागटिळक यांनी केले



**थकीत ऊस बिल मिळेपर्यंत विविध मार्गाने आंदोलन सुरूचं राहणार शेतकरी संघर्ष समितीचा निर्धार पक्का**

# गोकुळ शुगर लि.धोत्री थकीत ऊस बिलासाठी शेतकरी संघर्ष समिती बुधवार दि.१० जून रोजी सोलापूर येथील कंबर तलावात जलसमाधी आंदोलन करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरीइएस.के.गायकवाड : गोकूळ शुगर लि. धोत्री थकित ऊस बिल शेतकरी व शेतकरी संघर्ष समिती तुळजापूर व अक्कलकोट यांच्या वतीने सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी गोकुळ शुगर लि.धोत्री थकीत ऊस बिल मिळाले पाहिजे या प्रमुख मागणीसाठी ध धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज (कंबर तलाव ) विजापूर रोड सोलापूर येथे दि.१० जून २०२६ वार बुधवार रोजी दुपारी ठिक १२.०० वा.जलसमाधी आंदोलन करण्यासाठी कंबर कसली असून जोपर्यंत थकीत ऊस बिल मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन विविध मार्गाने सुरूच राहणार असा निर्धार आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी केला आहे.



पोटाला चिमटा देऊन रात्रीचा दिवस करून चटणी भाकर खाऊन दिवस रात्र उसाच्या फडात उभे राहून मुलांचे शिक्षण, मुलीचं लग्न थाटामाटात करण्याचे स्वप्न पहात पोटच्या लेकरागत ऊसाला जोपासलं वेळच्यावेळी खत पाणी घालून ऊस वाढवला पोसला आणि शेवटी कसायाच्या हातात दिला.असी दुर्दैवी अवस्था ऊस उत्पादक शेतकऱ्याची झाली असून गेंड्याची कातडी पांघरून निर्ढावलेल्या गोकुळ शुगर लिं. धोत्रीच्या मालक चालकाने अजून शेतकऱ्याच्या हातात एक दमडीही दिली नाही त्यामुळे सहनशीलतेचा बांध तुटून शेतकरी राजाला शेवटी रस्त्यावर उतरण्याची वेळ गोकुळ शुगर लि.धोत्रीच्या चे सर्वा सर्व चालक मालक यांनी आणली आहे.घरदार सोडून लेकरं बाळापासून दूर होऊन सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालया जवळ पूनम गेट समोर गोकुळ शुगर लि. धोत्री चे थकीत बिल मिळावे म्हणून आंदोलन करत असलेल्या धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची ही व्यथा आणि वेदना आहे.

गेल्या पंधरा दिवसापासून थकीत ऊस बिल मिळावे म्हणून धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर पूनम गेट वर या आंदोलनाला सुरुवात केली वेगवेगळ्या पध्दतीने भारतीय संविधानाने दिलेल्या घतनात्मक हक्कानुसार सनदशीर मार्गाने शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले आहे या आंदोलनात धाराशिव जिल्ह्यातील वागदरी,येडोळा,खुदावाडी सह सोलापूर जिल्ह्यातील . जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचा समावेश आहे.गोकुळ शुगर लि. धोत्री चे चालक-मालक संबंधित प्रशासन यांनी शेतकऱ्यांना दिशाभूल करून त्यांच्या फडातून ऊस घेऊन गेले कोणाचा शंभर टन कोणाचा अडीचशे ते तिन चारशे टन या प्रमाणे हजारो टन ऊस गोकुळ शुगर लि.ने गाळपासाठी घेतला परंतु दिलेला एकही शब्द न पाळता अद्याप शेतकऱ्याच्या हातावर एक दमडीही ठेवली नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या हक्काच्या मागणीसाठी गेल्या पंधरा दिवसा पासून ठिय्या आंदोलन सुरू केले आहे. तर दि.४जून रोजी अर्ध नग्न आंदोलन करून शेतकऱ्यांनी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले परंतु डोळ्यावर पट्टी तोंडावर बोट कानात गोळा घालून बसल्यागत संबंधित प्रशासनाने अद्याप म्हणावी तशी दखल या शेतकरी आंदोलनाची घेतली नाही म्हणून दि.१० जून २२६ रोजी सोलापूर येथील कंबर तलावात जलसमाधी आंदोलन करण्यासाठी शेतकऱ्यांनी कंबर कसली असून या आंदोलनास पोलीस उपायुक्तानी भेट दिली असता शेतकऱ्यानी सांगीतले की जोपर्यंत थकीत ऊस बिल मिळत नाही तोपर्यंत हे गोकुळ शुगर लि.धोत्री थकीत ऊस बिल आंदोलन सुरूच राहणार आहे.

या आंदोलनात शेतकरी संघर्ष समितीचे आरविंद घोडके,अमोल पाटील, जितेंद्र पाटील, खंडू कचरे, नामदेव महाबोले सह धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील शेकडो शेतकरी सहभागी आहेत.

# जिल्ह्यातील सर्व आशा वर्कर,आरोग्य सेवक आणि सेविका यांना पीसीपीएनडीटी कायद्याचे प्रशिक्षण द्यावे : जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन

## आरोग्य विभागाने जिल्हा दक्षता समितीच्या पुढील बैठकीपूर्वी किमान एक डीकॉय केस व दोन स्टिंग ऑपरेशन करावे

**■ सोलापूर जिल्ह्यातील एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ चे ० ते ६ वर्षे लिंग गुणोत्तर ९५७ इतके आहे**

**■ नागरिकांनी** www. amchimulgimaha.in `m g§Ho$VñWimda **तसेच हेल्पलाईन क्रमांक १८००-२३३-४४७५ व १०४ वर तक्रार करण्याचे आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : आरोग्य विभागाने ग्रामीण व शहरी भागात पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी सर्व आशा वर्कर, आरोग्य सेवक आणि सेविका यांना या कायद्याचे काटेकोरपणे प्रशिक्षण द्यावे. तसेच आरोग्य विभागाने जिल्हा दक्षता समितीच्या पुढील बैठकीपूर्वी या कायद्याअंतर्गत किमान एक डिकॉय केस व दोन स्टिंग ऑपरेशन करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित पीसीपीएनडीटी जिल्हा दक्षता समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, महापालिकेच्या आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने, यांच्यासह सर्व संबंधित आरोग्य यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन म्हणाले की, गर्भधारणा पूर्व व प्रसवपर्व निदान तंत्र निवडीस प्रतिबंध कायद्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आरोग्य यंत्रणेचे काम व्यवस्थित नाही. सन २०२५ मध्ये चार डिकॉय केस करण्यात आलेल्या होत्या, परंतु त्यातील एकही केस यशस्वी झालेली नाही. हे आरोग्य यंत्रणेचे अपयश असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे पुढील बैठकीपूर्वी यामध्ये शंभर टक्के सुधारणा करून एक डिकॉय व दोन स्टिंग ऑपरेशन यशस्वीपणे करावेत, असे निर्देश ही त्यांनी दिले.

सद्यस्थितीतील दहा चालू केसेसचा आढावा जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी घेऊन डिसमिस झालेल्या ११ केसेसचा अभ्यास विधी अधिकारी यांनी करावा व या केस कशा पद्धतीने पुन्हा उभा राहू शकतील यासाठी भक्कम आधार सुचवावेत व त्या अनुषंगाने पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करावा असेही त्यांनी निर्देशित केले.

जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याअंतर्गत एकूण ५० आरोपींवर खटले सुरू आहेत.२४ डिसेंबर २०२५ रोजी दाखल गुन्ह्यात १५ आरोपींवर कारवाई झाली असून १२ जणांना अटक व ३ आरोपींचा शोध सुरू आहे. ०७ जानेवारी २०२६ रोजी बेकायदेशीर सोनोग्राफी मशीनसह आरोपी पकडण्यात आला. सोनोग्राफी केंद्रे सोलापूर ग्रामीण कार्यक्षेत्रात २४३ सोनोग्राफी व १०२ एमटीपी केंद्रे नोंदणीकृत आहेत.ऑनलाईन एफ फॉर्म प्रणाली सर्व केंद्रांमध्ये सुरू असून त्रैमासिक तपासणी व ऑडिट केले जात आहे, अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डोईफोडे यांनी दिली. लिंग गुणोत्तरस्थिती दसन २०१७ मध्ये लिंग गुणोत्तर ८८५ होते, तर २०२४ मध्ये ते ९३१ पर्यंत सुधारले. २०२४ मध्ये जन्मावेळी लिंग गुणोत्तर ९३१ नोंदले गेले असून, पंढरपूर (९४६), करमाळा (९४३), बार्शी (९४१) यांसारख्या तालुक्यांमध्ये सुधारणा दिसून आली. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान ० ते ६ वर्षे वयोगटात एकूण लिंग गुणोत्तर ९५७ इतके आहे, असे डॉ. डोईफोडे यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम तसेच एचआयव्ही आणि एड्स कार्यक्रमाचा आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना केल्या.

■ राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम:- सोलापूर जिल्हा रुग्णालयात ९ जून २०२६ रोजी झालेल्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हास्तरीय बैठकीत एप्रिल २०२५ ते मे २०२६ दरम्यान ५०४ आरोग्य संस्था व १६९१ शाळा तंबाखूमुक्त घोषित झाल्या, २४ हजार ८९१ रुग्णांची नोंदणी झाली व त्यापैकी २१८ रुग्णांनी तंबाखूजन्य पदार्थांचा त्याग केला. कोटपा कायदा २००३ अंतर्गत १,६२४ लोकांवर कारवाई करून रू. २,९४,१३५ दंड वसूल करण्यात आला.




जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त मौखिक आरोग्य तपासणी, स्वाक्षरी मोहिम, चित्रकला स्पर्धा, संगीत थेरपी, महाराजस्व अभियान, कृषी प्रदर्शन, आषाढी वारीतील जनजागृती स्टॉल, तसेच जागर व्यसनमुक्तीचा उपक्रमांतर्गत संभळ वादन यांसारखे विविध उपक्रम राबवून जनतेमध्ये तंबाखू सेवनाविषयी व्यापक जनजागृती करण्यात आली.

■ राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत एप्रिल ते मार्च या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील मैत्री क्लिनिकमध्ये एकूण १९७२ किशोरवयीन मुला-मुलींनी नोंदणी करून समुपदेशन घेतले. उद्दिष्ट २२०० असून साध्य ८९.६३ टक्के झाले आहे.

■ जिल्ह्यातील एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एव्हीटीएचएस (EVTHS) अंतर्गत मातृ-आरोग्य व एचआयव्ही तपासणीसंदर्भातील कामगिरी समाधानकारक ठरली आहे.

# मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यासह जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय योजना व कागदपत्रांबाबत येणाऱ्या अडचणी तात्काळ सोडवण्यासाठी मानव अधिकार आंदोलन संघटनेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा. हनुमंत भाऊ पाटुळे यांच्या वतीने जिल्हाधिकारी, कार्यालय धाराशिव यांना दि.८ जुन२०२६ रोजी विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कळंब तालुक्यातील तहसिल कार्यालय पुरवठा विभागामार्फत नवीन रेशन कार्ड नागरीकांना दिलेले आहेत.परंतु त्या कार्ड धारकांनी वारंवार मागणी करून सुद्धा त्यांना धान्य उपलब्ध होत नाही त्या मुळे दिव्यांग,भुमीहीन, शेतकरी,व अंत्योदय कार्डधारकांची गैरसोय व उपासमार होत असुन त्यांना तात्काळ धान्य उपलब्ध करावे, त्याच बरोबर शासनाकडुन नागरीकांना अनेक योजना देण्यात येत आहेत त्या योजनेकरीता स्वतंत्र रेशनकार्ड लागते त्यामुळे नागरीकांना नवीन रेशनकार्ड देण्यात यावे, तसेच सद्यस्थितीत शाळेतील विद्यार्थ्यांना शासकीय कागदपत्रे काढण्यासाठी रेशनकार्ड मध्ये नाव दुरुस्ती करणे, नाव कमी करणे,नाव वाढ करणे अशी कामे विनाविलंब करावीत, तसेच मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेची ३१ डिसेंबर २०२५ पासून बंद असलेली ई-केवायसी प्रणाली तात्काळ सुरू करुन जिल्ह्यातील महीलांचे बंद असलेले अर्थसहाय्य तात्काळ चालु करुन त्यांचे डिसेंबर २०२५ पासुन चे थकीत अर्थसहाय्य तात्काळ खात्यात जमा करण्यात यावे, तसेच महीला व बालविकास विभागाच्या माध्यमातून बाल संगोपन योजनेतील जिल्ह्यातील अनेक लाभधारकांचे प्रस्ताव एप्रील व आगस्ट २०२५ रोजी मंजुरी झाले आहेत, परंतु लाभ मंजूर होऊन सुद्धा अद्यापही लाभधारकांना अर्थसहाय्य मिळालेले नाही ते अर्थसहाय्य तात्काळ देण्यात यावे, तसेच कळंब तालुक्यातील सन २०२५ मधील अतिवृष्टीग्रस्त काही शेतकऱ्यांचे अनुदान रखडले आहे ते तात्काळ अदा करावे, तसेच शालेय विद्यार्थ्यांचे शालेय प्रवेश सुरू होत असल्याने जात प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलिअर यांसारखी शैक्षणिक प्रमाणपत्रे विद्यार्थ्यांना विलंब न लागता उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून विद्यार्थी व युवकांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, अशी निवेदनात मागणी करण्यात आली आहे. महिला व बाल विकास विभाग, धाराशिव यांना याची माहिती देण्यात आली असून, जिल्हाधिकारी कार्यालयाने यावर त्वरित कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा संघटनेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. सदरील मागण्यांवर कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशाराही देण्यात आला आहे. या निवेदनावर मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मा.हनुमंत भाऊ पाटुळे, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# मेघराजराजे भोसले यांचा अखिल भारतीय चित्रपट महामंडळ निवडणुकीत दणदणीत विजय

**भविष्यवाणी ठरली खरी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : कोल्हापूर .अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत मेघराजराजे भोसले यांनी दणदणीत विजय संपादन करत आपल्या नेतृत्वाची छाप उमटवली आहे. निवडणुकीपूर्वी अनेक जाणकारांनी व्यक्त केलेली विजयाची भविष्यवाणी अखेर खरी ठरली असून त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

चित्रपट क्षेत्रातील विविध घटकांचा मोठा पाठिंबा मिळाल्याने मेघराजराजे भोसले यांनी प्रतिस्पर्ध्यांवर निर्णायक आघाडी घेत विजय मिळवला. त्यांच्या विजयामुळे चित्रपट महामंडळाच्या कार्यात नवचैतन्य निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

विजयाची घोषणा होताच समर्थकांनी जल्लोष करत अभिनंदनाचा वर्षाव केला. विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून चित्रपट क्षेत्राच्या विकासासाठी ते प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या निकालामुळे चित्रपट क्षेत्रातील नेतृत्वाला नवी दिशा मिळणार असून आगामी काळात महामंडळाच्या माध्यमातून अनेक सकारात्मक उपक्रम राबवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चंदनउटी पुजेची सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : ग्रीष्म ऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात करण्यात आली होती व आज दि.०९ जून रोजी सांगता पुजा मंदिर समितीचे सदस्य व अधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मिळावा या भावनेतून ही पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यात येते. या चंदनउटी पुजेची आज दि. ०९ जून रोजी सांगता पुजा झाली. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्य संभाजी शिंदे व लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच सदस्या शकुंतला नडगिरे व व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. यावेळी विभाग प्रमुख भिमाशंकर सारवाडकर, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे उपस्थित होते.



मागील वर्षी प्रमाणे ऑनलाईन पध्दतीने बुकींग भाविकांना श्रींची चंदनउटी पुजा करण्यास उपलब्ध करून दिली होती. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या पूजेच्या माध्यमांतून मंदिर समितीला सुमारे १४ लक्ष ६४ हजार इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेकडे अनुक्रमे रूपये २१,००० व ९,००० इतके देणगी मुल्य होते. दि.१९ मार्च ते ०९ जून कालावधीत एकूण पुजेचे ८२ दिवस उपलब्ध झाले होते. त्यामध्ये अधिक मास वगळता इतर दिवशी श्री विठ्ठलाकडे ५० व रूक्मिणीमातेकडे ४६ पुजा भाविकांसाठी उपलब्ध झाल्या होत्या. यापूजेसाठी अंदाजे ९० ते ९५ किलो चंदनाचा वापर करण्यात आला आहे. यंदा चंदनउटी पुजा कालावधीत अधिकमास आल्याने, अधिकमास कालावधीतील पुजा मंदिर समिती मार्फत करण्यात आल्या होत्या.

**सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांच्या पथकाची कारवाई**

**८ आरोपींवर गुन्हा दाखल तर ३ लाख ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त**

# अनवली येथे जुगार अड्ड्यावर पोलीसांची कारवाई



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : (दि.०८) अनवली (ता. पंढरपूर) येथे लिंबाच्या झाडाखाली जुगार खेळताना सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी धाड टाकून ८ जणांना ताब्यात घेतले आहे. तर त्यांच्याकडून ५६,५५० रू. रोख रक्कम, ५ मोबाईल, पत्याची पाने, ५ दुचाकी मोटार सायकल असा एकुण ३ लाख ८६,५५० रूपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना दि. ८ रोजी सायंकाळी ५.३० वा. घडली आहे.

दि.८ रोजी प्रशांत डगळे सहायक पोलीस अधीक्षक पंढरपूर यांना अनवली (ता.पंढरपूर) येथील गायरानामध्ये पाण्याचे टाकीजवळ येथे काही इसम मन्ना नावाचा पत्त्याचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलीस पथकाने ५.३० वा.छापा टाकला असता, एका लिंबाच्या झाडाखाली मोकळया जागेत काही इसम गोलाकर बसुन मन्ना नावाचा पत्याचा जुगार खेळत असल्याचे दिसले. त्यांना गराडा घालून जागीच पकडले. त्यांच्या समोरच वेगवेगळया दराच्या नोटा पडलेल्या दिसल्या. पकडलेल्यांमध्ये महादेव पांडुरंग रूपनर (वय ३४) रा. अनवली, हरी वासुदेव कुंभार (वय ३९) रा. चळे, योगेश शामराव ढोले (वय २८) रा. रांझणी, अनिल साधू डिसले (वय ५६) रा.अनवली, उमेश विठठल कोळी (वय ३८) रा. बठाण, प्रविण ईश्वर कांबळे (वय ३७) रा. गोपाळपूर, सोमनाथ दिलीप गुंड (वय ३५) रा. गोपाळपूर, ज्ञानेश्वर नामदेव गांजाळे, रा. अनवली (फरार) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून ५६,५५० रू. रोख रक्कम, ५ मोबाईल, पत्याची पाने, ५ दुचाकी मोटार सायकल असा एकुण ३ लाख ८६,५५० रूपयाचा मुद्देमाल मिळून आला आहे. पकडलेल्या ८ आरोपी विरूध्द पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे पो.ना. काकडे यांनी फिर्याद दिली आहे.



ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ रोंगे, पोकॉ हुलजंती, पोकॉ सावंत, पोकॉ कुचेकर, पोकॉ घायाळ, पोकॉ लोंढे यांनी पार पाडलेली आहे.